# NAGPUR CITY POLICE COMMISSIONERATE

नागपूर शहर पोलीस आयुक्तालय

**(पोलीस वार्तापत्र)**

(सायंकाळ)

**दिनांक ०१.०७.२०२६ बुधवार**

**१) सेवानिवृत्त पोलीस अधिकारी व अंमलदार यांचा निरोप समारंभ संपन्न :—**

दिनांक ३०.०६.२०२६ चे १७.०० वा. नागपुर पोलीस आयुक्तालयातर्फे पोलीस मुख्यालय परिसरातील अलंकार सभागृह येथे जुन—२०२६ मध्ये नियत वयोमानानुसार सेवानिवृत्त होणारे पोलीस अधिकारी, अंमलदार यांचा निरोप समारंभ कार्यक्रम मा. श्री विश्वास नांगरे पाटील, पोलीस आयुक्त, नागपुर शहर यांचे अध्यक्षतेखाली तसेच, मा. श्री. राजेंद्र दाभाडे, अपर पोलीस आयुक्त (गुन्हे) आणि मा. श्रीमती विनीता साहू, अपर पोलीस आयुक्त (उत्तर प्रभाग), नागपुर शहर यांचे प्रमुख उपस्थितीत आयोजीत करण्यात आलेला होता. सेवानिवृत्त होणारे पोलीस निरीक्षक, प्रशासकीय अधिकारी, पोलीस उपनिरीक्षक, श्रेणी पोलीस उपनिरीक्षक, सहायक पोलीस उपनिरीक्षक, पोलीस हवालदार व पोलीस अंमलदार पदावरील एकुण **६४** अधिकारी आणि अंमलदार यांना सपत्नीक भावपुर्ण निरोप देण्यात आला.

याप्रसंगी मा. पोलीस आयुक्त यांनी सर्व सेवानिवृत्त होणारे अधिकारी व अंमलदार यांना त्यांच्या पोलीस खात्यातील योगदानाचे कौतुक केले. तसेच, समाजात कायदा व सुव्यवस्था राखणेकरीता सेवानिवृत्त पो. अधिकारी व अंमलदार यांनी दिलेल्या बहुमुल्य सेवेबद्यल पोलीस दलातर्फे कृतज्ञता व्यक्त केली. सेवानिवृत्तांना पुढील आयुष्याकरीता शुभेच्छा देवुन, आहार कसा असावा याबद्यल मार्गदर्शनही केले आणि निरोगी आयुष्याकरीता व्यायामाचे महत्व समजावून सांगितले. कर्तव्यदक्षतेने व प्रामाणिकपणे पोलीस दलात सेवा दिल्याबद्यल मा. पोलीस आयुक्त यांनी व इतर वरिष्ठ पोलीस अधिकारी यांचे हस्ते शाल, श्रीफळ, स्मृतीचिन्ह व सेवा प्रमाणपत्र देऊन यथोचित गौरव करण्यात आला.

दिर्घकाळ एकत्र काम केल्यानंतर सेवानिवृत्त होणाऱ्या सहकाऱ्यांबद्यल बोलतांना अनेक पोलीस अंमलदार यांनी जुन्या आठवणींना उजाळा दिला, ज्यामुळे निरोप समारंभस्थळी वातावरण काहीसे भावनिक झाले होते. उपस्थित सर्वांनी सेवानिवृत्तांना त्यांचे पुढील सुखी, समृध्द आणि निरोगी आयुष्यासाठी मनस्वी शुभेच्छा दिल्या. या निरोप समारंभाचा क्षण हा आमचे कायम स्मरणात राहील अशा प्रकारची भावना सर्व सेवानिवृत्त अधिकारी, अंमलदार तसेच, त्यांचे कुटुंबियांनी व्यक्त केली. कार्यक्रमाची सांगता स्नेहभोजनाने झाली. सदर कार्यक्रम यशस्वी करण्याकरीता मानव संसाधन विभाग व पोलीस मुख्यालय येथील अधिकारी व अंमलदार यांनी परिश्रम घेतले.








**२) गुन्हेशाखा, अनैतिक मानवी वाहतुक प्रतिबंध पथक :— जनतेस आवाहन.**

राष्ट्रीय विधी सेवा प्राधिकरण (NALSA) यांना हरियाणा राज्य विधी सेवा प्राधिकरण (SLSA) कडुन पत्र प्राप्त झाले आहे. त्यामध्ये लाडवा, जिल्हा कुरूक्षेत्र, हरियाणा येथील जीवनमय विश्वास संस्था या बालसंगोपन संस्थेत (CCI) सध्या राहणाऱ्या एका ओळख न पटलेल्या बहिरा व मुक्या मुलाबाबत माहिती देण्यात आली की, नमुद मुलगा इस्माईलाबाद येथील टॅक्सी स्टॅन्डजवळ बेवारस स्थितीत मिळून आला होता. स्थानिक पोलीस व संबधित प्राधिकरणांनी प्रयत्न करूनही, त्या मुलाची तसेच, त्याच्या पालकांची व संरक्षकांची ओळख पटविण्यात यश आलेले नाही. करीता त्याचे आई—वडीलांचा शोध घेण्याबाबत निर्देशित करण्यात आले आहे.

मुलाची व किंवा त्याच्या पालकांची/संरक्षकांची ओळख पटविण्यासाठी समन्वित व देशव्यापी प्रयत्न करण्याच्या उद्देशाने सदर मुलाचे छायाचित्र सर्व जिल्हा विधी सेवा प्राधीकरणांमध्ये (DLSAS) प्रसारित करण्याची विनंती करण्यात आली आहे. त्या अनुषंगाने सदर मुलाचे छायाचित्र सोबत जोडण्यात आले आहे. मुलाबाबत कोणतीही माहिती मिळुन आल्यास अनैतिक मानवी वाहतुक प्रतिबंध कक्ष (AHTU) गुन्हे शाखा, नागपूर शहर यांचे संपर्क क्र. ०७१२—२५८६७६३ यावर संपर्क साधावा.



मुका व बहिरा बालक

**(गुन्हे)**

**पोलीस ठाणे वाठोडा :— घरफोडी करणाऱ्या आरोपीविरूध्द गुन्हा दाखल.**

दिनांक ३०.०६.२०२६ चे १८.३० वा. ते दिनांक ०१.०७.२०२६ चे ०८.०० वा. चे दरम्यान, पोलीस ठाणे वाठोडा हद्दीत प्लॉट क्र. ४ बी, वासे हाऊसिंग सोसायटी, पांढुर्णा गाव, आनंद सेलिब्रेशन लॉनसमोर, वाठोडा नागपूर येथे राहणारे फिर्यादीचे प्रविण परसराम सातपुते वय ३३ वर्ष हे आपले राहते घराला कुलुप लावुन परिवारासह गाव गारला तह. कामठी जि. नागपूर येथे गेले असता, कोणीतरी अज्ञात चोरट्याने फिर्यादीचे घराचे मुख्य दाराचे कुलूप व कडी—कोंडा तोडुन, आंत प्रवेश करून, घरातील लोखंडी आलमारीमधील रोख ३०,०००/—रू. व सोन्याचे वेगवेगळे दागिने असा एकुण किंमती १,११,०००/—रू. चा मुद्देमाल चोरून नेला.

याप्रकरणी फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारीवरून पोलीस ठाणे वाठोडा येथे सपोनि. अमोल कोल्हे ७७५५९४२१०० यांनी अज्ञात आरोपीविरूध्द कलम ३०५(अ),३३१(३),३३१(४) भा.न्या.सं. अन्वये गुन्हा दाखल केला आहे. आरोपीचा शोध व पुढील तपास सुरू आहे.

**(मिसिंग)**

**१) पोलीस ठाणे जुनी कामठी:—** शिवम रविकुमार वय १७ वर्षे रा. दाळओली क्र. २, राजेंद्रप्रसाद चुन्नीलाल साहे यांचे दुकानावर, कामठी, नागपूर हा दिनांक १९.०६.२०२६ रोजी पोलीस ठाणे जुनी कामठी हद्दीतील आपले कामावर गेला होता. घरी परत आला नाही. त्याचा शोध घेतला असता मिळून आला नाही. **वर्णन** रंग—सावळा, चेहरा—लांबट, बांधा—सडपातळ, उंची—५ फुट, डोक्याचे केस—काळे, अंगात—लाल रंगाचा हॉफ टि—शर्ट व काळया रंगाची जिन्सपॅन्ट व पायात ब्राऊन रंगाची चप्पल घातलेली आहे. भाषा—भोजपुरी/हिंदी बोलतो. ओळखचिन्ह— समोरील दोन दात किडलेले असून उजवे हातावर त्रिशुल गोंदलेले आहे.

**२) पोलीस ठाणे बेलतरोडी :—** कु. रिया विजय रत्ने वय १८ वर्षे रा. फ्लॅट क्र. ई—३, प्रितम अपार्टमेंट, चिचभवन, संजना गॅस एजन्सीजवळ, बेलतरोडी, नागपूर ही दिनांक २६.०६.२०२६ चे १०.०० वा. सुमारास, पोलीस ठाणे बेलतरोडी हद्दीतील राहते घरी कोणाला काही न सांगता घरुन निघून गेली. घरी परत आली नाही. तिचा शोध घेतला असता मिळून आली नाही. **वर्णन** रंग—निमगोरा, चेहरा—गोल, बांधा—मध्यम डोक्याचे केस—काळे व लांब, उंची : ५ फुट २ इंच, डोळे—काळे, अंगात—क्रिम रंगाचा झाडे फुले प्रिंट असलेला सलवार सुट घातलेला असून पायात गुलाबी सॅन्डल घातलेली आहे. भाषा—मराठी/हिंदी बोलते. ओळखचिन्ह— डावे डोळयाचे बाजुला मस्सा आहे.


शिवम


कु. रिया

**(ईतर)**

**आरोपींनी न्यायालयात हजर होणेबाबत :—**

मा. विद्यमान न्यायाधीश यांनी त्यांचे कोर्टातील केस क्र. व कलम मधील खालील नमुद आरोपी/साक्षीदार हे तारखेवर सतत गैरहजर राहत असल्याने त्यांचेविरुध्द जाहीरनामा प्रसिध्द केला आहे. खालील तक्त्यात नमुद आरोपी / साक्षीदार यांनी नमुद तारखेपर्यंत मा. न्यायालयासमोर हजर व्हावे.

| अ | कोर्टाचे नाव | केस क्र. | कलम | आरोपीचे नाव व पत्ता | पेशी तारीख |
|---|---|---|---|---|---|
| १. | मा. अति. मुख्य न्यायदंडाधिकारी, नागपुर. | ३००११४ /२०१५ | कलम १४१,१४३, १४६, १४९,४२७, ३२४, ५०६ भा. दं.वि. | मयुर उर्फ बहिऱ्या मनोहर सावरकर वय १९ वर्ष रा. नंदनवन झोपडपट्टी, गली क्र. २, केडीके कॉलेजजवळ, नंदनवन, नागपुर | ०४.७.२०२६ |

**स्वा/—**

**( अंकुश राठोड )**
**पोलीस उपनिरीक्षक,**
**पोलीस जनसंपर्क अधिकारी,**
**नागपुर शहर.**